# योजनेचे नाव :- मिनी आय टी आय

मिनी.आय. टी. आय. योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील १८ ते ३५ वयोगटातील बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी या जिल्हयात तिरोडा येथे मिनी. आय. टी. आय. (लघु औद्यौगिक प्रशिक्षण संस्था) सन १९९९ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

मिनी. आय. टी. आय. तिरोडा येथे दरवर्षी ६ महिने कालावधीकरीता १) मोटार आर्मेचर वाईडींग, २) वेल्डींग ॲन्ड जाईडींग, ३) स्कुटर, मोटार सायकल दूरुस्ती हे प्रशिक्षणाचे तीन ट्रेड सुरु आहेत. प्रती ट्रेड २० या प्रमाणे तीनही ट्रेडचे एकूण ६० प्रशिक्षणार्थ्यांना सदर प्रशिक्षण क्रेंद्रामध्ये प्रशिक्षण दिले जात आहे.

सदर प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ५००/- (अक्षरी - पाचशे रु. ) विद्यावेतन दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सदर प्रशिक्षणार्थ्यांना मोफत टूलकिट्स वितरीत करण्यात येतात. उपरोक्त प्रशिक्षण पुर्ण करुन व उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई यांचेकडून संबंधीत प्रशीक्षणाचे प्रमाणपत्र दिले जाते. त्याचप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याकरीता स्वर्णजयंजी ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत अनुदानावर बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.